# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.12.2024** **वारःशुक्रवार**

---

1. राज्यघटना स्वीकारण्याच्या घटनेला 75 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त लोकसभेत आजपासून विशेष चर्चा.
2. उत्तर प्रदेशमधल्या महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज विकास प्रकल्पांचं उद्घाटन.
3. नोव्हेंबरमध्ये देशाचा किरकोळ महागाई दरात घट
4. राष्ट्रीय तपास संस्थेचे देशात विविध ठिकाणी छापे आणि
5. युवा बुद्धिबळपटू गुकेशची ऐतिहासिक कामगिरी; देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव

**लोकसभा चर्चा**

देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला 75 वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून दोन दिवस त्यावर विशेष चर्चा होणार आहे. प्रश्नोत्तराच्या तासानंतर या चर्चेला सुरुवात होईल. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह संविधानावरील या चर्चेची तुरुवात करतील. नंतर विविध पक्षांचे नेते दोन दिवस त्यावर सभागृहात आपले विचार मांडतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या यावरील चर्चेला उत्तर देतील. राज्यसभेत 16 आणि 17 तारखेला संविधानावर चर्चा होणार आहे. या विशेष चर्चेच्या अनुषंगानं काल पंतप्रधानांनी भाजपचे अध्यक्ष जे.पी नड्डा, अमित शहा यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमवेत धोरणात्मक बैठक घेतली. हिवाळी अधिवेशनात संविधानावर चर्चा घ्यावी अशी विरोधी पक्षांची प्रमुख मागणी होती

**मोदी-प्रयागराज**

उत्तरप्रदेशमधल्या प्रयागराजमध्ये पुढच्या वर्षी होत असलेल्या महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 7 हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत. या प्रकल्पांमध्ये 10 नवीन पूल तसेच उड्डाणपूल, कायमस्वरूपी घाट आणि नदीसमोरील रस्त्यांचे बांधकाम या विकास कामांचा यात समावेश आहे. प्रयागराज आणि आजूबाजूच्या परिसरातील प्रवास यामुळे सुलभ होण्यास मदत होणार आहे. प्रक्रिया न केलेले सांडपाणी गंगेत वाहून जाण्यापासून रोखण्याच्या उद्देशाने एका प्रकल्पाचे उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमावर विधीवत पूजा करून आणि तिथलं दर्शन घेऊन मोदी आपल्या दौऱ्याची सुरुवात करणार आहेत. हा महाकुंभमेळा पुढील वर्षी 13 जानेवारी ते 26 फेब्रुवारी या कालावधीत होणार असून मोदी महाकुंभ स्थळालाही भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान मोदी एका चॅटबॉटचं उद्घाटनही करणार आहेत.

**अरब अमिराती**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर आणि संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्रमंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद बिन सुलतान अल नाहयान आज नवी दिल्ली येथे 15 व्या भारत- संयुक्त अरब अमिरातीच्या संयुक्त आयोगाच्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषविणार आहेत. दोन्ही नेत्यांनी काल नवी दिल्लीत धोरणात्मक बैठकीत चर्चा केली. धोरणात्मक चर्चा हे एक प्रभावी व्यासपीठ असून याद्वारे परस्पर संबंधांच्या मुद्यांवर चर्चा झाल्याचं डॉ जयशंकर यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील व्यापक धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**कॉंग्रेस-दिल्ली**

आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाने 21 उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली आहे. पक्षाने बादली विधानसभा मतदारसंघातून प्रदेशाध्यक्ष देवेंद्र यादव, नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून संदीप दीक्षित, बल्लीमारन मतदारसंघातून हारून युसूफ, वजीरपूरमधून रागिणी नायक, सीलमपूरमधून अब्दुल रहमान आणि सदर बाजार विधानसभा मतदारसंघातून अनिल भारद्वाज यांना उमेदवारी दिली आहे.

**महागाई दर**

नोव्हेंबरमध्ये देशाचा किरकोळ महागाई दर कमी होऊन 5 पूर्णांक 48 शतांश टक्क्यांवर आला. यापूर्वीच्या म्हणजे ऑक्टोबर महिन्यात तो 6 पूर्णांक दोन दशांश टक्के होता. ग्रामीण भागाचा महागाई दर शहरी भागाच्या 4 पूर्णांक 83 शतांश टक्क्यांच्या तुलनेत 5 पूर्णंक 95 शतांश टक्के इतका असल्याचं सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं प्रकाशित केलेल्या आकडेवारीतून दिसून आलं आहे. अखिल भारतीय ग्राहक अन्नधान्य निर्देशांकावर आधारित अन्नधान्याचा महागाई दर नोव्हेंबरमध्ये 9 पूर्णांक चार शतांश टक्क्यावर आला आहे. ऑक्टोबरमध्ये तो 10 पूर्णांक 9 दशांश टक्के होता. मुख्यत्वे अन्न आणि पेयांच्या भावात घट झाल्यानं महागाई दर कमी झाला असल्याचं सांख्यिकी मंत्रालयानं म्हटलं आहे.

**विजयदिवस**

भारतीय लष्कराच्या वज्र कोअरतर्फे आजपासून अमृतसर इथं विजय दिवस साजरा करण्यात येणार आहे. पाकिस्तानविरुद्ध 1971 च्या युद्धात मिळवलेल्या विजयाचा 53 वा वर्धापनदिन येत्या 16 तारखेला साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराचे सामर्थ्य आणि तांत्रिक प्रगती दाखवण्यासाठी दोन दिवसीय प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. तर 15 डिसेंबर रोजी "एक शाम वीरों के नाम" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. सारागडीच्या युद्धावरील कार्यक्रम तसच भारतीय सैन्याचा समृद्ध वारसा दर्शविणारी लघुफित यावेळी दाखवली जाणार आहे. या युद्धादरम्यान सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना बँड पथकाच्या कार्यक्रमातून श्रद्धांजली अर्पण केली जाणार आहे.

**संसद हल्ला**

13 डिसेंबर 2001 रोजी संसदेवर झालेल्या घटनेला आज 23 वर्षे पूर्ण होत आहेत. या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या सुरक्षा जवानांना आणि पीडितांना देशभरातून श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री, खासदार आज संसद भवनात हुतात्म्यांना पुष्पांजली अर्पण करणार आहेत.

**गुंतवणूक योजना**

देश परदेशातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीकरिता आकर्षित करण्यासाठी राज्य शासनामार्फत आता विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. देशातील तसेच परदेशी गुंतवणुकीसाठी गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांवर त्यांना सल्ला आणि मदत देण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. नवीन गुंतवणुकीसाठी जागतिक आणि प्रादेशिक गुंतवणूक व्यापारासह सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं.

**एनआयए छापे**

जैश ए महंमद या संघटनेच्या दहशतवादी कट प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयएनं काल आठ राज्यांत 19 ठिकाणी छापे घातले. या छाप्यांमधून बरीच आक्षेपार्ह कागदपत्रं, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, पेन ड्राईव्ह, सीडी, हार्डडिस्क असं साहित्य हस्तगत करण्यात आलं आहे. शेख सुलतान सलाउद्दीन अयुबी या जैश ए महंमदच्या हा म्होरक्या आरोपीच्या जवळच्या साथीदारांच्या जागांवरही छापे टाकण्यात आल्याचं एनआयएकडून सांगण्यात आलं. खोटा प्रचार करणारं साहित्य वितरित केल्याच्या आरोपाखाली अयुबी ऑक्टोबरपासून एनआयएच्या कोठडीत आहे.

**<u>इस्राइल</u>**

पॅलेस्टाईनबद्दलचे भारताचे धोरण फार पूर्वीपासून आहे आणि इस्त्रायलबरोबर शांततेत राहून सुरक्षित सीमांमध्ये पॅलेस्टाईनचे सार्वभौम, स्वतंत्र आणि व्यवहार्य संबंध स्थापित करण्यासाठी वाटाघाटीद्वारे दोन्ही देशांच्या तोडग्याला भारताने नेहमीच पाठिंबा दिला असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. यासंदर्भात राज्यसभेत एका लेखी उत्तरात परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंग म्हणाले की, 7 ऑक्टोबर 2023 रोजी इस्रायलवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा आणि इस्रायल-हमास संघर्षात नागरिकांच्या जीवितहानीचा भारताने तीव्र निषेध केला आहे. भारत तिथल्या परिस्थितीबद्दल चिंतित असून युद्धविराम, सर्व ओलीसांची सुटका, संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे संघर्ष कमी करून शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन करत आहे असंही सिंग यावेळी म्हणाले. इस्त्रायल पॅलेस्टाईनच्या मुद्द्यावर संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावांवर भारताने केलेले मतदान हे धोरणाशी सुसंगत असल्याचंही सिंग यांनी बोलताना सांगितलं.

**<u>इम्रानखान</u>**

पाकिस्तानच्या एका न्यायालयाने पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि त्यांची पत्नी बुशरा बीबी यांना तोषखाना प्रकरणात दोषी ठरवलं आहे. सौदी राजघराण्याने मे 2021 च्या भेटीमध्ये काही मौल्यवान वस्तू भेट म्हणून दिल्या होत्या त्या वस्तू सरकारी तोषखान्यात जमा करण्याऐवजी इम्रान खान यांनी स्वतःकडे ठेवल्या होत्या असा आरोप पाकिस्तानच्या एन ए बी नं केला आहे. इम्रानखान यांच्यावर  सध्या अनेक आरोप असून ते रावळपिंडीच्या अदियाला तुरुंगात आहेत.

**<u>बुद्धिबळ</u>**

भारताचा 18 वर्षीय ग्रँडमास्टर डोम्माराजू गुकेश बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वात कमी वयाचा जगज्जेता बनला आहे. सिंगापूरमध्ये झालेल्या फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या 14 व्या आणि अंतिम फेरीत गुकेशनं काल चीनच्या डिंग लिरेवर मात करत 18व्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचं विजेतेपद मिळवून इतिहास रचला. या दोघांमध्ये विजेतपदासाठी लढतीच्या एकंदर 14 फेऱ्या झाल्या. त्यापैकी तीन फेऱ्या गुकेशनं तर दोन डिंगनं जिंकल्या, 9 फेऱ्या अनिर्णित राहिल्या, अखेरच्या फेरीत गुकेशनं डिंगला चेकमेट करत साडेसात गुणांसह हे ऐतिहासिक यश प्राप्त केलं. गुकेशच्या या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे.

**<u>हॉकी</u>**

भारताने काल ओमानमधील मस्कत येथे महिला कनिष्ठ हॉकी आशिया चषक स्पर्धेतील चौथ्या पूल ए सामन्यात थायलंडचा 9-0 असा पराभव केला. या विजयासह, भारताने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि चिली येथे पुढील वर्षी होणाऱ्या FIH कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले. उद्या उपांत्यफेरीत भारताचा सामना जपानशी होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.